॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

Fax : (02462) 215572 NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२२-२३/८८, दिनांक : १०/०८/२०२२

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
नांदेड जिल्हयातील रा.से.यो. राबविणारी सर्व महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्यासंबधी निर्देशांबाबत

संदर्भ:१) मा.जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र क्र. २०२२/सा.शा. १/टे-१२/प्र.क्र. दि. ०४/०८/२०२२.
२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११०(भाग-२)/सां.का.४ दि२०/०७/२०२२.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ अन्वये मा.जिल्हाधिकारी ,नांदेड यांनी संदर्भ क्र २ च्या शासन निर्णयामध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, भारतीय स्वातंत्र्याचे ७५ वर्षे पुर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या मनात या स्वातंत्र्य लढयाच्या स्मृती तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक/क्रांतिकारक/ स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायम स्वरूपी जनमानसात रहावी, या उद्देशाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. सदर उपक्रम यशस्विपणे राबविण्यासाठी खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

१) महाविद्यालये व विद्यपीठांचे रा.से.यो.विद्यार्थी, एनसीसी विद्यार्थी, स्काऊटचे विद्यार्थी यांच्या माध्यमातून प्रभात फे-यांचे मोठया प्रमाणात आयोजन करावे.

२) महाविद्यालये व विद्यापीठ स्तरावर चर्चासत्रे, कार्यशाळा, परिसंवाद, निबंधस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पदयात्रा मॅराथॉन, हेरीटेज पदयात्रा, प्रदर्शने असे उपक्रम राबविण्यात यावेत.

३) विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर देशभक्ती, देशप्रेम यांचेशी निगडीत छोटेखानी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

४) जिल्हयातील प्रत्येक कार्यालयात, घरोघरी तिरंगा विषयक पोस्टर, बॅनर्स, स्टॅडीज, होर्डिंग लावण्यात यावेत.

५) कार्यालयातील स्वागत कक्षामध्ये ठेवण्यात आलेल्या एलईडी स्क्रीनवर घरोघरी तिरंगा विषयक मजकूर, जिंगल गाणी प्रसारित करण्यात यावेत.

६) जिल्हास्तरावर किंवा सुरू असलेल्या संपन्न झालेल्या कार्यक्रमाचे फोटो व तपशिल मराठी/हिंदी/इंग्रजी या भाषांमध्ये २०० शब्दामध्ये https://mahaamrut.org या वेबसाईटवर अपलोड करण्यात यावेत.

पेज नं २ वर

त्या अनुषंगाने नांदेड जिल्हयातील रा.से.यो. राबविणा-या सर्व संलग्नित महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की आपल्या महाविद्यालयात “स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” अंतर्गत “हर घर तिरंगा” उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या उपरोक्त प्रमाणे निर्देशांचे काटेकोर पणे पालन करून कार्यक्रम साजरा करण्यात यावा, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत कार्यवाहीस्तव :

सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या रा.से.यो. विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.